## आजचे पंचांग

दिनांक : २७ ऑगस्ट २०२६ वार : गुरुवार माह (अमावस्यांत) : श्रावणमाह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : चतुर्दशी तिथी (सकाळी ०९:०८ पर्यंत) त्यानंतर पौर्णिमा तिथी नक्षत्र : धनिष्ठा नक्षत्र (२८ ऑगस्ट रात्री ०२:१५ पर्यंत) त्यानंतर शततारका नक्षत्र योग : शोभन योग (सकाळी ०७:५५ पर्यंत) त्यानंतर अतिगण्ड योग करण : वाणीजा करण (सकाळी ०९:०८ पर्यंत) त्यानंतर विस्ती भद्रा करण

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## "तुमच्यावर लक्ष आहे"

**नवी दिल्ली :** काश्मीर खोऱ्यात पुन्हा एकदा १९९० सारखे दहशतीचे वातावरण निर्माण करून काश्मिरी पंडितांना धमकावण्याचा प्रयत्न केला जात आहे. काश्मीरमध्ये काश्मिरी पंडित असलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांची एक हिटलिस्ट सोशल मीडियावर व्हायरल करून त्यांना जीवे मारण्याची उघड धमकी देण्यात आली आहे. या यादीमध्ये कर्मचाऱ्यांची नावे, मोबाईल नंबर, कामाचे ठिकाण, तसेच त्यांच्या घरांच्या नंबरसह अचूक पत्ते देण्यात आले आहेत. या धक्कादायक प्रकारानंतर संपूर्ण खोऱ्यामध्ये सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरूवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३२९ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### दूध संकलनापासून लोखंडाच्या विक्रीपर्यंत वजनकाट्यांचा 'झोल'; बारामतीत तपासणीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती : प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील विविध भागांत वजन-मापात तफावत करून ग्राहक व शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील दूध संकलन केंद्रांवर वापरण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांमध्ये छेडछाड करून वजनात तफावत केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत आहे. या प्रकाराची तातडीने चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

बांधकामासाठी लागणारे लोखंड व अन्य साहित्य खरेदी करताना वजनानुसार बिल आकारले जाते. मात्र, काही ठिकाणी वजनकाट्यांमध्ये बेकायदेशीर छेडछाड करून प्रत्यक्ष वजनापेक्षा कमी माल दिला जात असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे ग्राहकांचे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

ग्रामीण भागात दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांकडून दूध संकलन करताना इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांचा वापर केला जातो. काही संकलन केंद्रांवरील काट्यांमध्ये छेडछाड करून वजनात तफावत केली जात असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या आहेत. दररोज मोठ्या प्रमाणात दूध संकलित होत असल्याने वजनातील अगदी किरकोळ तफावतही शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम करणारी ठरू शकते.

वजन-मापातील संभाव्य फसवणूक रोखण्यासाठी वैधमापनशास्त्र विभागाने बाजार समित्या, लोखंड व बांधकाम साहित्य विक्रीची दुकाने तसेच दूध संकलन केंद्रांवरील इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांची अचानक तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. काट्यांचे सील, पडताळणी प्रमाणपत्र, त्याची वैधता व प्रत्यक्ष वजन यांची तपासणी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, असे नागरिक व शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

**तक्रार व कारवाईसाठी प्रभावी यंत्रणेची गरज**

वजन-मापातील तफावतीमुळे ग्राहक अथवा शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्यास त्यांना तक्रार करण्यासाठी स्पष्ट व सुलभ व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. संबंधित विभागाने विशेष मोहीम राबवून तालुक्यातील वजनकाट्यांची तपासणी करावी. तसेच दोषी आढळलेल्या व्यावसायिकांवर कठोर कारवाई करून त्याची माहिती सार्वजनिक करावी.

# पुरस्कार विजेता शिक्षक ते पेपरफुटीचा आरोपी; सरकारच्या 'सुशासना'चा हा कोणता नमुना?

### ४० हजार विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर पाणी; एमपीएससीची परीक्षा सुरक्षित ठेवण्यात सरकार आणि यंत्रणा अपयशी ठरल्याचा गंभीर सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील तरुणांनी सरकारी नोकरीच्या आशेने महिनोन्महिने अभ्यास करायचा, हजारो रुपये खर्च करायचे, परीक्षा द्यायची आणि अखेर प्रश्नपत्रिकाच फुटल्याचे समोर यायचेही महाराष्ट्राच्या प्रशासनाची शोकांतिका आहे. एमपीएससीच्या औषध निरीक्षक पदाच्या भरती परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाने परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी पुन्हा एकदा उघड्या पाडल्या आहेत. त्याहून धक्कादायक म्हणजे या प्रकरणातील मुख्य आरोपी म्हणून समोर आलेल्या शिक्षकाला यापूर्वी राज्यस्तरीय उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार मिळाल्याचे सांगितले जात आहे.

२२ मार्च रोजी झालेल्या परीक्षेला सुमारे ४० हजार उमेदवार बसले होते. त्यांच्यापैकी प्रत्येकाने आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवून परीक्षा दिली. मात्र, परीक्षेच्या दोन दिवस आधीच प्रश्नपत्रिका मिळाल्याचा आरोप समोर आला असेल, तर त्या ४० हजार विद्यार्थ्यांच्या मेहनतीची भरपाई कोण करणार? फेरपरीक्षा घेणे हा उपाय असू शकतो; पण गेलेला वेळ, मानसिक ताण आणि सरकारी यंत्रणेवरील विश्वासाचे काय?

या प्रकरणात प्रश्नपत्रिका मिळवण्यासाठी आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप आहे. पोलिस तपासात सहा जणांना अटक झाल्याचेही समोर आले आहे. प्रकरणातील वैयक्तिक संबंध, प्रेमसंबंध आणि तक्रारीमागील कथित कारणे कितीही नाट्यमय असली, तरी त्यापेक्षा मोठा प्रश्न आहे तो परीक्षेची गोपनीयता भेदली कशी?

एमपीएससीसारख्या राज्यातील सर्वोच्च भरती संस्थेची परीक्षा कोणत्याही बाहेरील व्यक्तीला सहज उपलब्ध होऊ शकत असेल, तर सुरक्षा यंत्रणेची जबाबदारी नेमकी कोणाची? परीक्षा केंद्रापासून प्रश्नपत्रिका तयार होण्यापर्यंत आणि वितरणापासून निकालापर्यंत प्रत्येक टप्प्यावर नियंत्रण असताना गैरप्रकार घडतोच कसा?

सत्ताधारी भाजप सरकारने 'सुशासन', पारदर्शक प्रशासन आणि तरुणांना रोजगाराच्या संधींची आश्वासने दिली आहेत. मात्र, वारंवार समोर येणारे भरती परीक्षांतील गैरप्रकार सरकारच्या प्रशासनक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करतात. निवडणूक व्यवस्थापनात अचूकता दाखवणाऱ्या सरकारला परीक्षा व्यवस्थापनात एवढी असहाय्यता का?

सरकारने आता केवळ आरोपींना अटक करून किंवा फेरपरीक्षा घेऊन विषय संपवू नये. प्रश्नपत्रिका सुरक्षेतील प्रत्येक पायरीची स्वतंत्र चौकशी, संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आणि भविष्यात पेपरफुटी अशक्य होईल अशी तंत्रज्ञानाधारित व्यवस्था उभी करणे आवश्यक आहे.

कारण हा केवळ एका परीक्षेचा घोटाळा नाही. ही महाराष्ट्रातील लाखो तरुणांच्या विश्वासाची परीक्षा आहे आणि त्या परीक्षेत सरकार पुन्हा नापास झाले, तर त्याची किंमत संपूर्ण पिढीला मोजावी लागेल.

## दिव्यांग मुलाची पोटगी १८ वर्षांनी संपत नाही; सक्षम होईपर्यंत पालकांची जबाबदारी कायम

### छत्तीसगड उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय; केवळ वय नव्हे, तर स्वावलंबी होण्याची क्षमता महत्त्वाची

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रायपूर : प्रतिनिधी**

दिव्यांग, मतिमंद किंवा ऑटिझम असलेल्या मुलाची पोटगी केवळ वयाची १८ वर्षे पूर्ण झाली म्हणून आपोआप बंद करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय छत्तीसगड उच्च न्यायालयाने दिला आहे. संबंधित मूल स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास आणि कमाई करण्यास सक्षम होईपर्यंत त्याच्या देखभालीची जबाबदारी पालकांवर राहणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

कनिष्ठ कौटुंबिक न्यायालयाने मुलाने १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर पोटगी बंद करण्याचा आदेश दिला होता. या निर्णयाला आव्हान देण्यात आल्यानंतर उच्च न्यायालयाने हा आदेश रद्द केला. दिव्यांग किंवा मानसिक स्थितीमुळे स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या मुलाच्या बाबतीत केवळ वयाची मर्यादा लावणे योग्य ठरणार नाही, असे न्यायालयाच्या निर्णयातून स्पष्ट झाले.

न्यायालयाने पोटगीचा अधिकार ठरविताना मुलाचे वय हा एकमेव निकष असू शकत नाही, यावर भर दिला. मूल प्रत्यक्षात स्वतःची आर्थिक गरज भागवू शकते का, त्याला रोजगार मिळवून स्वतःचे पोट भरणे शक्य आहे का आणि त्याची दिव्यांगता किंवा मानसिक स्थिती त्याच्या स्वावलंबनाच्या आड येत आहे का, याचा विचार करणे आवश्यक आहे.

भारतीय कायद्यातही शारीरिक किंवा मानसिक व्याधीमुळे स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या मुलांच्या देखभालीसाठी विशेष संरक्षणाची तरतूद आहे. त्यामुळे १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही अशा मुलांना परिस्थितीनुसार पालकांकडून आर्थिक आधार मिळण्याचा अधिकार राहू शकतो. हा निर्णय केवळ पोटगीच्या कायदेशीर तरतुदीपुरता मर्यादित नसून दिव्यांग मुलांच्या हक्कांच्या दृष्टीनेही महत्त्वाचा मानला जात आहे. सामान्य मुलांसाठी प्रौढत्वाची वयोमर्यादा लागू होत असली तरी विशेष गरजा असलेल्या मुलांच्या बाबतीत त्यांची प्रत्यक्ष जीवन जगण्याची क्षमता आणि आर्थिक स्वावलंबन हा अधिक महत्त्वाचा निकष ठरतो. १८ वर्षे पूर्ण झाली म्हणजे जबाबदारी संपली, असा सरसकट दृष्टिकोन न्यायालयाने नाकारला आहे. दिव्यांग मुलाला स्वतःच्या पायावर उभे राहता येत नसेल, तर त्याच्या जगण्याची जबाबदारी केवळ वयाच्या आकड्यामुळे संपुष्टात येऊ शकत नाही, असा या निर्णयाचा व्यापक संदेश आहे.

## औषध निरीक्षक भरती रद्द : परीक्षा यंत्रणेची पुन्हा परीक्षा!

### परीक्षा घ्यायची, निकाल लावायचा, मुलाखती घ्यायच्या आणि अखेर संपूर्ण प्रक्रिया रद्द करायची; विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या या कारभाराला जबाबदार कोण?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

सरकारी नोकरीच्या एका जागेसाठी वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या तरुणांच्या मेहनतीची किंमत पुन्हा एकदा परीक्षा यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे शून्यावर आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अन्न व औषध प्रशासनातील औषध निरीक्षक, गट-ब पदाची संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करून फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, परीक्षा झाल्यानंतर निकाल जाहीर झाला, ५०६ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरले, त्यापैकी ४८८ जणांच्या मुलाखतीही पूर्ण झाल्या आणि तात्पुरती गुणवत्ता यादीही प्रसिद्ध झाली. एवढी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर गैरप्रकाराच्या तक्रारी समोर आल्या. मग परीक्षा यंत्रणा नेमकी करत काय होती?

२२ मार्च २०२६ रोजी सहा विभागीय मुख्यालयांवर ऑफलाइन पद्धतीने चाळणी परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर १२ जूनला निकाल जाहीर झाला. जुलैमध्ये मुलाखती झाल्या. मात्र, २२ ते २६ जुलैदरम्यान काही उमेदवार आणि लोकप्रतिनिधींनी परीक्षा सुरू होण्यापूर्वीच काही उमेदवारांना प्रश्नपत्रिका अथवा प्रश्न मिळाल्याच्या तक्रारी केल्या. प्रश्न सोशल मीडिया किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसारित झाल्याचा आरोपही करण्यात आला. गंभीर तक्रारी आल्यानंतर आयोगाने मुंबई पोलिसांकडे चौकशी सोपवली. गुन्हे अन्वेषण शाखेच्या प्राथमिक चौकशीत एका उमेदवाराला प्रश्नसंच मिळाल्याचे आणि त्याचा लाभ झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. यानंतर आयोगाला अखेर संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घ्यावा लागला. हा केवळ एका परीक्षेचा प्रश्न नाही. सरकारी भरती प्रक्रियेत वारंवार उद्भवणाऱ्या पेपरफुटी, गैरप्रकार आणि प्रशासकीय त्रुटींच्या पार्श्वभूमीवर हा प्रकार परीक्षा यंत्रणेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. सरकारकडे परीक्षा घेण्याची यंत्रणा आहे; पण ती सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह ठेवण्याची जबाबदारी कोणाची? उमेदवारांनी पुन्हा अर्ज करायचा नाही आणि फेरपरीक्षेसाठी शुल्कही आकारले जाणार नाही, ही काही प्रमाणात दिलासादायक बाब आहे. मात्र, उमेदवारांचा गेलेला वेळ, मानसिक ताण आणि अभ्यासासाठी खर्च केलेली वर्षे कोण परत देणार?

निवडणुका वेळेवर घेण्यासाठी यंत्रणा चोवीस तास सक्रिय असते; मग तरुणांच्या भवितव्याशी संबंधित परीक्षा सुरक्षितपणे घेण्यासाठी तीच तत्परता का दिसत नाही? सरकारने केवळ फेरपरीक्षा जाहीर करून थांबू नये; परीक्षा प्रक्रियेतील त्रुटींसाठी जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई करावी. अन्यथा प्रत्येक भरतीची परीक्षा ही उमेदवारांची नसून सरकारी यंत्रणेचीच परीक्षा ठरेलआणि निकाल पुन्हा पुन्हा 'अनुत्तीर्ण'च लागेल.

## धर्माच्या नावावर रस्तेही 'आपलेच' का? न्यायालयाचा राजकीय हट्टाला आरसा

### धार्मिक स्वातंत्र्य म्हणजे विशिष्ट मिरवणूक मार्गावर हक्क नव्हे; राजकीय स्वार्थासाठी धार्मिक आग्रह वाढविणाऱ्यांना मुंबई उच्च न्यायालयाचा स्पष्ट संदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

धर्म पाळण्याचे स्वातंत्र्य संविधानाने दिले आहे; पण धर्माच्या नावाखाली सार्वजनिक रस्ते, चौक आणि मार्गांवर आपला जन्मसिद्ध अधिकार असल्यासारखा आग्रह धरण्याचा अधिकार कोणालाही दिलेला नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने धार्मिक मिरवणुकीसाठी विशिष्ट मार्गाचा आग्रह धरणे हा मूलभूत अधिकार नसल्याचे स्पष्ट करताना धार्मिक स्वातंत्र्य आणि सार्वजनिक शांतता यांच्यातील सीमारेषा ठळक केली आहे.

संविधानाच्या कलम २५ अंतर्गत प्रत्येकाला आपल्या धर्माचे पालन आणि आचरण करण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र हे स्वातंत्र्य निरंकुश नाही. सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता आणि आरोग्याच्या अधीन राहूनच धार्मिक स्वातंत्र्याचा वापर करता येतो. त्यामुळे एखाद्या मिरवणुकीसाठी 'हा मार्गच हवा', असा आग्रह कायदेशीर अधिकार म्हणून मांडता येणार नाही. संवेदनशील परिस्थितीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाला मार्ग बदलण्याचा अधिकार आहे.

न्यायालयाचा हा निर्णय अशा काळात आला आहे, जेव्हा धार्मिक भावना आणि राजकारण यांचे मिश्रण अधिकाधिक आक्रमक होताना दिसत आहे. सण-उत्सव हे श्रद्धेचे आणि सामाजिक एकोप्याचे माध्यम असायला हवेत; मात्र अनेकदा त्याच उत्सवांचा वापर शक्तिप्रदर्शन, राजकीय ध्रुवीकरण आणि मतांच्या गणितासाठी केला जातो. 'धर्म धोक्यात आहे'पासून 'हा रस्ताच हवा'पर्यंतचा प्रवास मग श्रद्धेपेक्षा राजकीय दबावाचे साधन बनतो.

विशेषतः धार्मिक मुद्द्यांवर राजकारण करणाऱ्या पक्षांनी न्यायालयाच्या या भूमिकेचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. धार्मिक आचरणाचा अधिकार आणि सार्वजनिक जागेवर राजकीय दबाव निर्माण करण्याचा अधिकार हे दोन वेगळे विषय आहेत. श्रद्धेच्या नावाखाली प्रशासनाला झुकविण्याची स्पर्धा सुरू झाली, तर प्रत्येक रस्ता धार्मिक प्रतिष्ठेचा प्रश्न बनेल आणि प्रत्येक उत्सव कायदा-सुव्यवस्थेची परीक्षा ठरेल. प्रशासनाची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. मार्ग बदलण्याचा अधिकार म्हणजे मनमानी करण्याचा परवाना नव्हे. निर्णय वस्तुनिष्ठ, पारदर्शक आणि सर्व धर्मांसाठी समान निकषांवर आधारित असायला हवा. अन्यथा प्रशासनाच्या निर्णयावरही पक्षपातीपणाचा आरोप होऊ शकतो.

आज गरज आहे ती धर्माच्या नावावर आग्रह नव्हे, तर संविधानाच्या चौकटीत आचरणाची. न्यायालयाने दाखवून दिलेली ही मर्यादा राजकीय पक्ष, धार्मिक संघटना आणि प्रशासनसर्वांनी स्वीकारली, तर सण उत्सवांचे राहतील; ते संघर्षाचे राजकीय रणांगण बनणार नाहीत.

## लग्न म्हणजे मालकी हक्क नव्हे; पत्नीच्या स्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवता येणार नाही

### कर्नाटक उच्च न्यायालयाचा स्पष्ट संदेश; घरकाम आणि सासू-सासऱ्यांची सेवा ही केवळ सुनेची जबाबदारी नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बंगळुरु : प्रतिनिधी**

लग्न झाले म्हणून पत्नीवर मालकी हक्क निर्माण होत नाही, असा स्पष्ट आणि महत्त्वपूर्ण संदेश कर्नाटक उच्च न्यायालयाने दिला आहे. पत्नी ही घरकाम करण्यासाठी किंवा सासू-सासऱ्यांची सेवा करण्यासाठी ठेवलेली कर्मचारी अथवा पतीची खासगी मालमत्ता नाही, असे कठोर निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. विवाहामुळे महिलेच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर नियंत्रण मिळवण्याचा अधिकार पतीला मिळत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती डॉ. चिलकूर सुमालता यांच्या खंडपीठाने पतीची याचिका फेटाळताना केवळ लिंगाच्या आधारावर महिलेचे स्वातंत्र्य मर्यादित करणे हे घटनात्मक समानता आणि मानवी प्रतिष्ठेच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याचे नमूद केले. पत्नीला माहेरी जाण्यासाठी पतीची परवानगी सक्तीची करणे किंवा तिच्या इच्छेविरुद्ध तिच्यावर नियंत्रण ठेवणे, हा वैवाहिक नात्यातील अधिकाराचा भाग मानता येणार नाही.

न्यायालयाने घरातील कामांच्या वाटणीबाबतही महत्त्वाचे भाष्य केले. घर चालवणे ही केवळ महिलेची जबाबदारी नसून पुरुष आणि महिला दोघांनीही घरकामात समान सहभाग घेतला पाहिजे. तसेच वृद्ध आई-वडिलांची काळजी घेण्याची प्राथमिक जबाबदारी त्यांच्या मुलांची आहे; केवळ सून असल्यामुळे ती जबाबदारी तिच्यावर लादता येणार नाही.

# नेपाळमध्ये जलप्रलय; ८ जणांचा मृत्यू, १०५ भारतीय पर्यटक बेपत्ता

### भोटेकोशी नदीला अचानक पूर; ३८४ जण संपर्काबाहेर, १४ हेलिकॉप्टरद्वारे युद्धपातळीवर बचावकार्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**काठमांडू : प्रतिनिधी**

नेपाळमध्ये बुधवारी (२६ ऑगस्ट) आलेल्या भीषण अचानक पुरामुळे मोठी हानी झाली. तिबेटच्या दिशेने आलेल्या पाण्याच्या प्रचंड लोंढ्यामुळे भोटेकोशी नदीचे पात्र फुगले असून रसुवा, नुवाकोट आणि धादिंग परिसराला मोठा फटका बसला आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत किमान आठ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त असून, मोठ्या संख्येने नागरिक आणि पर्यटक बेपत्ता आहेत.

नेपाळ पर्यटन मंडळाच्या माहितीनुसार, पूरग्रस्त भागात ३८४ प्रवासी संपर्काबाहेर आहेत. त्यामध्ये २९१ विदेशी पर्यटक आणि ९३ नेपाळी नागरिकांचा समावेश आहे. विदेशी पर्यटकांमध्ये १०५ भारतीय नागरिक असल्याने भारतातही चिंता वाढली आहे. मात्र, दळणवळण व्यवस्था विस्कळीत झाल्यामुळे अनेक जण संपर्काबाहेर असण्याची शक्यता असून, सर्वच जण संकटात असल्याचे मानणे घाईचे ठरेल.

बुधवारी सकाळी सुमारे नऊ वाजता भोटेकोशी नदीच्या पाण्याची पातळी अचानक वाढली. वेगवान प्रवाहामुळे टिमुरे आणि स्याफ्रुबेसी परिसरातील रस्ते, पूल, वाहने आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. नदीकाठच्या वस्त्यांमधील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याचे काम सुरू आहे.

रस्ते आणि दळणवळणाचे मार्ग खंडित झाल्याने नेपाळ



सरकारने हवाई बचावकार्याला प्राधान्य दिले आहे. नेपाळ लष्कराने सहा लष्करी आणि आठ खासगी, अशा एकूण १४ हेलिकॉप्टरची मदतीसाठी तैनाती केली आहे. आतापर्यंत किमान २५ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे.

जखमींसाठी २० तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक, त्यात दोन सर्जनचा समावेश आहे, त्रिशूली परिसरात तैनात करण्यात आले आहे. एमआय-१७ हेलिकॉप्टरच्या माध्यमातून वैद्यकीय मदत आणि हवाई स्थलांतर सुरू आहे.

दरम्यान, पंतप्रधान बालेंद्र शाह यांनी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आपत्कालीन बैठक बोलावली आहे. नेपाळ लष्कर, सशस्त्र पोलीस दल, नेपाळ पोलीस, रेड क्रॉस आणि वैद्यकीय पथकांच्या समन्वयातून बचावकार्य वेगाने सुरू आहे. बेपत्ता भारतीय पर्यटकांचा शोध आणि त्यांची सुरक्षितता निश्चित करणे हे आता सर्वाधिक प्राधान्याचे आव्हान ठरले आहे.

## संपादकीय

### इथेनॉल धोरणापासून देशाच्या प्रत्येक सुधारणेपर्यंत नियोजन कुठे आहे, मोदीजी?

सरकारची सुधारणा म्हणजे केवळ घोषणा, लक्ष्ये आणि टाळ्यांचा कडकडाट एवढीच आहे का? देश चालवताना एखादे धोरण जाहीर करणे सोपे असते; पण त्याचे परिणाम, बाजारातील बदल, उद्योगांची गुंतवणूक, शेतकऱ्यांचे हित आणि देशाची अन्नसुरक्षा यांचा एकत्रित विचार करून दीर्घकालीन आराखडा तयार करणे ही खरी कसोटी असते. इथेनॉल धोरणाने मात्र या कसोटीत केंद्र सरकारच्या नियोजनाचा अभाव पुन्हा एकदा उघड केला आहे. निवडणुकीत यंत्रणा प्रभावीपणे चालवणाऱ्या सरकारकडे देशाच्या सुधारणांसाठी अशीच सक्षम 'प्लॅनिंग मशिनरी' आहे का, हा प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विचारण्याची वेळ आली आहे.

पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट वाढवताना सरकारने साखर उद्योगाला मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिले. खासगी आणि सहकारी साखर कारखान्यांनी कोट्यवधी रुपये खर्चून डिस्टिलरी आणि इथेनॉल प्रकल्प उभारले. सरकारने दिलेल्या धोरणात्मक संकेतांवर विश्वास ठेवून उद्योगांनी क्षमता वाढवली. मग साखरेचे उत्पादन घटले, दर वाढले आणि देशांतर्गत उपलब्धता कमी झाली, तेव्हा इथेनॉल निर्मितीसाठी साखरेचा वापर करण्यावर निर्बंध आले. प्रश्न असा आहे की, धोरण ठरवताना या परिस्थितीचा अंदाज सरकारला का आला नाही?

एकीकडे पेट्रोल आयात कमी करण्यासाठी इथेनॉलचा वापर वाढवायचा आणि दुसरीकडे त्याच इथेनॉलसाठी ऊस, मका आणि धान्य वळवायचे; परिणामी अन्नधान्य, डाळी आणि खाद्यतेलाच्या आयातीची गरज निर्माण झाली, तर या धोरणाला दूरदृष्टीचे धोरण कसे म्हणायचे? पेट्रोल आयातीवर वाचवलेले परकीय चलन आणि अन्नपदार्थांच्या आयातीवर खर्च होणारे परकीय चलन यांचा सरकारने कधी एकत्रित हिशेब मांडला आहे का?

याहून गंभीर बाब म्हणजे इथेनॉलचा वापर केवळ इंधनापुरता मर्यादित नाही. रासायनिक, औषधनिर्मिती आणि अन्य औद्योगिक क्षेत्रांनाही त्याची गरज असते. इंधनासाठी मोठ्या प्रमाणावर इथेनॉल वळवल्यानंतर देशांतर्गत उद्योगांनाच महागडे इथेनॉल आयात करण्याची वेळ आली, तर मग आत्मनिर्भरतेच्या घोषणांचे काय झाले? एका क्षेत्राला प्रोत्साहन देताना दुसऱ्या क्षेत्राची कोंडी करणे म्हणजे सुधारणा नव्हे; ती धोरणात्मक विसंगती आहे.

आज साखरेचे दर वाढले आहेत. कारखान्यांनी इथेनॉल उत्पादनाची क्षमता उभी केली आहे. मात्र त्या तुलनेत खरेदी दर आणि कोट्याचे नियोजन स्पष्ट नसेल, तर उद्योगांची गुंतवणूक अडकणारच. ऑइल मार्केटिंग कंपन्यांकडून इथेनॉल खरेदीचे कोटे कसे ठरतात, त्यात पारदर्शकता किती आहे, याचे उत्तर सरकारने द्यायला हवे.

आणि हा प्रश्न केवळ इथेनॉलपुरता नाही. कृषी सुधारणा असोत, शिक्षण असो, रोजगार असो, आरोग्य व्यवस्था असो, ऊर्जा धोरण असो किंवा औद्योगिक धोरणघोषणा आधी आणि परिणामांचा अभ्यास नंतर, अशी पद्धत देशाला किती काळ परवडणार? प्रत्येक सुधारणा निवडणुकीच्या घोषणापत्रातील 'उपलब्धी' दाखवण्यासाठी नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठी स्थिर व्यवस्था निर्माण करण्यासाठी असते.

मोदीजी, देशाला लक्ष्यांची संख्या नको; लक्ष्य गाठण्यासाठीची शाश्वत यंत्रणा हवी आहे. निवडणुका जिंकण्यासाठी बूथनिहाय नियोजन करता येते, प्रचाराचे सूक्ष्म व्यवस्थापन करता येते, मग देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी, अन्नसुरक्षेसाठी आणि उद्योगांसाठी पाच-दहा वर्षांचे समन्वित नियोजन का करता येत नाही?

'सुधारणा' हा शब्द आकर्षक आहे; पण सुधारणा म्हणजे धरसोड नव्हे. आज प्रोत्साहन, उद्या निर्बंध आणि परवा पुन्हा प्रोत्साहनया चक्रातून उद्योग, शेतकरी आणि ग्राहक यांना बाहेर काढणे हीच खरी परीक्षा आहे. देशाला घोषणाबाजीची नव्हे, तर दूरदृष्टीची सरकारची 'प्लॅनिंग मशिनरी' हवी आहे. इथेनॉलने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. आता उत्तर देण्याची जबाबदारी सरकारची आहे.

# श्रेया घोषाल यांना २१ वा 'आशा भोसले पुरस्कार' २९ ऑगस्टला चिंचवडमध्ये पुरस्कार वितरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा, पिंपरी-चिंचवड कलारंग प्रतिष्ठान आणि सिद्धिविनायक ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा प्रतिष्ठित 'आशा भोसले पुरस्कार २०२६' यंदा सुप्रसिद्ध पार्श्वगायिका श्रेया घोषाल यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात होणार असल्याची माहिती नाट्य परिषदेचे पिंपरी-चिंचवड शाखाध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते श्रेया घोषाल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या वेळी विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर, आमदार अमित गोरखे, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल यांच्यासह कला व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पुरस्काराचे स्वरूप १ लाख ११ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे आहे.

**'आशा से श्रेया तक'ची सांगीतिक मैफल**

पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त मोरया थिएटर निर्मित 'आशा से श्रेया तक' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम सादर केला जाणार आहे. आशा भोसले आणि श्रेया घोषाल यांच्या गाजलेल्या सदाबहार गीतांची मैफल या कार्यक्रमातून रसिकांना अनुभवता येणार आहे.

हा संपूर्ण सोहळा संगीतप्रेमी आणि नागरिकांसाठी विनामूल्य





खुला आहे. कार्यक्रमाच्या वेळेच्या अर्धा तास आधी प्रेक्षकांनी आसनस्थ व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**दिग्गजांच्या गौरवाची परंपरा**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेतर्फे २००२ पासून हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार दिला जात आहे. आतापर्यंत लता मंगेशकर, खय्याम, रवींद्र जैन, बप्पी लहरी, प्यारेलाल, आनंदजी, पं. हृदयनाथ मंगेशकर, उषा मंगेशकर, अनु मलिक, शंकर महादेवन, पं. शिवकुमार शर्मा, सुरेश वाडकर, हरिहरन, सोनू निगम, सुनिधी चौहान, उदित नारायण, रूपकुमार राठोड, अवधूत गुप्ते, डॉ. सलील कुलकर्णी आणि शान यांच्यासारख्या दिग्गजांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

पुरस्कारासाठी स्वतंत्र निवड समिती असून त्यामध्ये पं. हृदयनाथ मंगेशकर, डॉ. रवींद्र घांगुर्डे, वंदना घांगुर्डे, दिलीप काटकर, राजेशकुमार साकला आणि भाऊसाहेब भोईर यांचा समावेश आहे.

**श्रेया घोषाल यांचा संगीतप्रवास**

श्रेया घोषाल यांनी वयाच्या चौथ्या वर्षापासून संगीताचे धडे घेण्यास सुरुवात केली. पं. महेशचंद्र शर्मा आणि मुक्ता भिडे यांच्याकडून हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी 'सारेगामापा'च्या चिल्ड्रेन स्पेशल कार्यक्रमाचे विजेतेपद मिळवले.

'देवदास' चित्रपटातील 'बैरी पिया' आणि 'डोला रे' या गीतांमुळे त्यांच्या पार्श्वगायन कारकिर्दीला मोठी झेप मिळाली. त्यानंतर हिंदीसह मराठी, बंगाली, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम, आसामी, भोजपुरी आणि पंजाबी अशा विविध भाषांमध्ये त्यांनी हजारो गाणी गायली.

'जादू है नशा है', 'बरसो रे', 'तेरी ओर', 'ये इश्क हाय', 'दीवानी मस्तानी' यांसह मराठीतील 'जीव दंगला' आणि 'मेरे ढोलना' ही त्यांची लोकप्रिय गाणी आहेत. त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, फिल्मफेअर पुरस्कारांसह विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

पत्रकार परिषदेला नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष किरण येवलेकर, कोषाध्यक्ष राजेंद्र बंग, संतोष रासने, गौरी लोंढे, सहकोषाध्यक्ष संतोष शिंदे, सदस्य सुदाम परब आदी उपस्थित होते.

संगीत क्षेत्रातील नामवंत कलाकाराचा गौरव आणि आशा भोसले यांच्या गाजलेल्या गीतांचा सांगीतिक आविष्कार यामुळे यंदाचा 'आशा भोसले पुरस्कार' सोहळा पिंपरी-चिंचवडमधील रसिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

# भोसरीत १ लाख ७३ हजार २०७ मतदारांचे अर्ज 'असंकलनीय'; महायुतीच्या विजयाच्या गणितावर परिणाम होणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवडमधील भोसरी विधानसभा मतदारसंघात विशेष सघन पुनरिक्षण (ड्खठ) मोहिमेदरम्यान तब्बल १ लाख ७३ हजार २०७ मतदारांचे अर्ज 'असंकलनीय' म्हणून नोंदविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. एवढ्या मोठ्या संख्येने मतदारांचे अर्ज असंकलनीय ठरल्याने मतदारयादीतील या तफावतीचा आगामी निवडणुकीतील राजकीय समीकरणांवर काय परिणाम होणार, याबाबत चर्चेला उधाण आले आहे.

भोसरी हा पिंपरी-चिंचवडमधील अत्यंत महत्त्वाचा आणि प्रतिष्ठेचा विधानसभा मतदारसंघ मानला जातो. विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्या मतदारसंघात एवढ्या मोठ्या प्रमाणात मतदारांचे अर्ज संकलित न होणे हा निवडणूक यंत्रणेसमोरील गंभीर प्रश्न मानला जात आहे.

नेमके 'असंकलनीय' म्हणजे काय?

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सघन पुनरिक्षण मोहिमेत बूथ लेव्हल अधिकाऱ्यांकडून (इडज) घराघरांत जाऊन मतदारांची पडताळणी केली जात आहे. या प्रक्रियेत संबंधित मतदाराचा अर्ज प्रत्यक्ष उपलब्ध न झाल्यास किंवा त्याची पडताळणी होऊ न शकल्यास तो अर्ज 'असंकलनीय' म्हणून नोंदविला जातो.

मतदार घरात उपलब्ध नसणे, स्थलांतरित होणे, एकापेक्षा अधिक ठिकाणी नोंद असणे किंवा संबंधित मतदाराचा मृत्यू झालेला असणे यांसारख्या कारणांमुळेही अशा नोंदी होऊ शकतात. त्यामुळे 'असंकलनीय' ठरलेला प्रत्येक मतदार अपात्र आहे, असा थेट अर्थ काढता येत नाही.

निवडणुकीच्या गणितावर परिणामाची शक्यता

भोसरी मतदारसंघात १.७३ लाखांहून अधिक मतदारांच्या नोंदी या वर्गात गेल्याने अंतिम मतदारयादीत किती नावे कायम राहतात, याकडे राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. विशेषतः सत्ताधारी महायुती आणि विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्या आगामी निवडणूक रणनीतीवर या आकडेवारीचा परिणाम होऊ शकतो, अशी चर्चा सुरू झाली आहे.

मात्र, सध्या हे अर्ज 'असंकलनीय' म्हणून नोंदविले गेले आहेत; त्यामुळे संबंधित मतदारांची नावे अंतिम मतदारयादीतून निश्चितपणे वगळली जातील, असे मानणे घाईचे ठरेल. पुढील पडताळणी आणि दुरुस्ती प्रक्रियेनंतरच वास्तविक चित्र स्पष्ट होणार आहे.

मतदारांना दुरुस्तीची संधी

विशेष पुनरिक्षण प्रक्रियेदरम्यान एखाद्या पात्र मतदाराचे नाव प्राथमिक यादीत नसल्याचे आढळल्यास संबंधित मतदाराला निर्धारित कालावधीत फॉर्म क्रमांक ६ सादर करून आवश्यक कागदपत्रांसह मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी मिळते.

त्यामुळे भोसरीतील १ लाख ७३ हजार २०७ 'असंकलनीय' नोंदींपैकी प्रत्यक्षात किती मतदार स्थलांतरित आहेत, किती नोंदी दुबार किंवा मृत मतदारांच्या आहेत आणि किती पात्र मतदारांची पडताळणी अद्याप बाकी आहे, हे स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भोसरीतील मतदारयादीतील हा मोठा आकडा राजकीयदृष्ट्या संवेदनशील ठरला असून, अंतिम मतदारयादी जाहीर झाल्यानंतरच या बदलाचा नेमका परिणाम स्पष्ट होणार आहे.

# जेन झीला आकर्षित करण्यासाठी ठडडचा नवा प्रयोग; हिंदुत्वाची धार बाजूला ठेवून 'सामाजिक सद्भाव'वर भर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे । प्रतिनिधी

तरुणाईच्या बदलत्या मानसिकतेचा अंदाज घेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने ( पुण्यात 'सामाजिक सद्भाव' बैठकांचा जोर वाढविला आहे. विशेषतः जेन झी पिढीला आकर्षित करण्यासाठी संघाने आपल्या पारंपरिक हिंदुत्वाच्या मुद्द्यांना काही काळ बाजूला ठेवून राष्ट्रवाद, सामाजिक सलोखा, सेवा आणि संवादाच्या माध्यमातून तरुणांपर्यंत पोहोचण्याची रणनीती आखल्याची चर्चा आहे.

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या 'छात्रों की गूंज' कार्यक्रमाला पुण्यात तरुणांचा मोठा प्रतिसाद मिळाल्यानंतर भाजपविरोधी वातावरणाची धार वाढत असल्याचे राजकीय चित्र निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर तरुण मतदारांचा बदलता कल लक्षात घेऊन संघाने मैदानात उतरण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

जेन झी पिढीला पारंपरिक राजकीय चौकटीत बांधून ठेवणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. धर्म, हिंदुत्व किंवा केवळ भावनिक राष्ट्रवादापेक्षा रोजगार, शिक्षण, आर्थिक संधी, सामाजिक समानता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि भविष्यातील सुरक्षितता यांसारख्या प्रश्नांना ही पिढी अधिक महत्त्व देते. त्यामुळे 'हिंदुत्व' हा संघाचा मूलभूत विचार बाजूला ठेवून थेट तरुणांच्या प्रश्नांवर संवाद साधण्याचा प्रयत्न या बैठकांमधून होत असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. पुण्यात 'सामाजिक सद्भाव' बैठका यापूर्वीही होत असल्या तरी आता विविध भागांमध्ये त्यांचे आयोजन करून तरुणांना मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेतले जात आहे. संघाचे ज्येष्ठ पदाधिकारी या बैठकांमध्ये देशाचा इतिहास, सांस्कृतिक वारसा, सामाजिक परिस्थिती आणि आर्थिक विषयांवर चर्चा करत आहेत.

# मेट्रो, बस, पार्किंग, शौचालये पण नागरिककेंद्री नियोजनाचा खरा कस अंमलबजावणीत!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड : वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि वाहनांची वाढती संख्या यामुळे पिंपरी-चिंचवडसमोर वाहतूक, पार्किंग, सार्वजनिक सुविधा आणि नागरी व्यवस्थापनाची आव्हाने दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेने महामेट्रो फेज-२, ईआरटीएस बस सेवा, वाहन पार्किंग धोरण आणि सार्वजनिक शौचालय धोरण याबाबत सादरीकरण करत आगामी २० ते २५ वर्षांचा विचार करून नियोजन करण्यावर भर दिला आहे.

महापौर रवि लांडगे यांनी शहराचा विकास करताना नागरिकांना केंद्रस्थानी ठेवण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. नगरसदस्यांनी मांडलेल्या सूचनांचा केवळ बैठकीच्या इतिवृत्तात समावेश न करता त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी आणि त्याचा कालबद्ध प्रगती अहवाल सादर करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

निगडी-चाकण मेट्रोला गतीची गरज

महामेट्रो फेज-२ अंतर्गत प्रस्तावित निगडी-चाकण मार्गिका ही पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेसाठी महत्त्वाची मानली जात आहे. शहरातील निवासी व व्यावसायिक भागांना चाकणच्या औद्योगिक पट्ट्याशी जोडणाऱ्या या मार्गामुळे प्रवासाचा वेळ कमी होण्याबरोबरच रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण कमी होण्याची अपेक्षा आहे.

मात्र, मेट्रोची घोषणा आणि प्रत्यक्ष धावणारी मेट्रो यातील अंतर शहराने यापूर्वीही अनुभवले आहे. त्यामुळे प्रस्तावित मार्ग, स्थानके आणि कनेक्टिव्हिटीबाबत नगरसदस्यांनी केलेल्या सूचनांना किती गांभीर्याने घेतले जाते आणि प्रकल्प प्रत्यक्षात किती वेगाने पुढे जातो, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

मेट्रो हा केवळ वाहतुकीचा प्रकल्प नसून शहराच्या पुढील अनेक दशकांच्या विकासाची दिशा ठरविणारा प्रकल्प



आहे, असे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

ईआरटीएसच्या मार्गावर नागरिकांचा प्रवास महत्त्वाचा

ईआरटीएस बस सेवेमुळे सार्वजनिक वाहतुकीला पर्याय मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र, बसचे मार्ग केवळ तांत्रिक निकषांवर निश्चित न करता कामगार, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि रोजच्या प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन ठरविण्याची गरज आहे.

औद्योगिक शहर म्हणून पिंपरी-चिंचवडची वाहतूक व्यवस्था मोठ्या प्रमाणावर कामगार आणि विद्यार्थ्यांच्या दैनंदिन प्रवासावर अवलंबून आहे. त्यामुळे ईआरटीएसची खरी परीक्षा ही कागदावरील मार्गांमध्ये नव्हे, तर नागरिकांच्या घरापासून कामाच्या आणि शिक्षणाच्या ठिकाणापर्यंत ती किती प्रभावीपणे पोहोचते यात असेल.

पार्किंग धोरण नागरिकांना दिलासा देणार की नवा बोजा?

शहरातील वाहनसंख्या वाढत असताना पार्किंगचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत आहे. बाजारपेठा, व्यापारी भाग आणि गर्दीच्या ठिकाणी नियोजनबद्ध पार्किंगची गरज आहे. मात्र, पार्किंग धोरण नागरिकांसाठी समस्या सोडविणारे असावे; दंड, शुल्क आणि निर्बंध वाढविणारे आणखी एक प्रशासकीय धोरण ठरू नये, याची दक्षता घेण्याची गरज आहे.

स्थानिक परिस्थिती आणि नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन धोरण तयार करण्याचे निर्देश महापौरांनी दिले आहेत. त्याची अंमलबजावणी करताना या भूमिकेचे किती पालन होते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

सार्वजनिक शौचालये बांधून जबाबदारी संपत नाही

सार्वजनिक शौचालयांच्या धोरणात उपलब्धता, स्वच्छता, देखभाल, सुरक्षितता आणि नियमित दुरुस्तीवर भर देण्यात आला आहे. केवळ सार्वजनिक शौचालयांची उभारणी करून महापालिकेची जबाबदारी संपत नाही, अशी स्पष्ट भूमिका महापौरांनी मांडली.

शहरातील अनेक सार्वजनिक सुविधांप्रमाणेच शौचालयांची उभारणी झाल्यानंतर त्यांची देखभाल हा मोठा प्रश्न ठरतो. त्यामुळे नव्या धोरणाचा खरा परिणाम शौचालयांची संख्या वाढण्यात नव्हे, तर ती स्वच्छ, सुरक्षित आणि प्रत्यक्ष वापरण्यायोग्य राहण्यात दिसायला हवा.

'आजचे नियोजन उद्याच्या शहरासाठी'

पुढील २० ते २५ वर्षांचा विचार करून पिंपरी-चिंचवडच्या विकासाचे नियोजन करण्याची गरज महापौरांनी व्यक्त केली आहे. लोकप्रतिनिधींच्या सूचना, प्रशासनाचे तांत्रिक नियोजन आणि नागरिकांच्या प्रत्यक्ष गरजा यांचा समन्वय साधण्यावर भर देण्यात आला आहे.

शहराचा विस्तार वेगाने होत असताना केवळ नवे प्रकल्प जाहीर करणे पुरेसे नाही. मेट्रो वेळेत पूर्ण होणे, बससेवा नागरिकांना उपयोगी ठरणे, पार्किंगचा प्रश्न सुटणे आणि सार्वजनिक सुविधा देखभालीअभावी निष्प्रभ न होणेयातूनच नागरिककेंद्री नियोजनाची खरी परीक्षा होणार आहे.

त्यामुळे सादरीकरणांच्या मालिकेनंतर आता प्रशासनासमोर सर्वात मोठे आव्हान आहे ते निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे. कारण पिंपरी-चिंचवडला पुढील २० वर्षांचे शहर बनविण्याची चर्चा जितकी महत्त्वाची आहे, तितकेच आजच्या नागरिकाला त्याचा प्रत्यक्ष फायदा मिळणेही महत्त्वाचे आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### तलाव कोरडे, पिके करपण्याच्या मार्गावर; चासच्या पाण्याची आस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरूर । प्रतिनिधी**

पावसाने यंदा ऐन पावसाळ्यातच पाठ फिरवल्याने शिरूर तालुक्याच्या पूर्व भागातील तलाव कोरडेठाक पडले आहेत. यामुळे शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, नुकतेच सुरू झालेल्या चासकमान डाव्या कालव्याच्या आवर्तनात तलाव पूर्ण क्षमतेने भरून द्यावेत, अशी आग्रही मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. शिरूर तालुक्यासाठी वरदान ठरणारे चासकमान धरण यंदा पावसाने पूर्ण क्षमतेने भरले होते. त्यामुळे महिनाभरापूर्वी डाव्या कालव्याला पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले होते. मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे काही दिवसांपूर्वी हे पाणी अचानक बंद करण्यात आले. याविरोधात शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर प्रशासनाला नमते घ्यावे लागले आणि पुन्हा कालव्याला पाणी सोडण्यात आले.

उल्लेखनीय म्हणजे, यंदा मे महिन्यातच शिरूर तालुक्यात दुष्काळसदृश स्थिती निर्माण झाली होती.त्यावेळीही चासकमान डाव्या कालव्याचे आवर्तन सोडण्यात आले होते, मात्र कमी कालावधीसाठी आणि अल्प क्षमतेने आलेल्या या पाण्यामुळे तालुक्यातील सर्वच तलाव भरू शकले नव्हते.

परिणामी अनेक शेतकरी पाण्यापासून वंचित राहिले आणि पूर्व भागातील बहुतांश पिके करपून गेली होती. जुलै महिन्यात सलग तीन दिवस पडलेल्या रिमझिम पावसाने पिकांना काहीसे जीवदान दिले, मात्र त्यानंतर पुन्हा पावसाने दडी मारल्याने ऐन पावसाळ्यातच पिके जळण्याची भीती निर्माण झाली आहे.

# आंबेगावातील वनक्षेत्रात मुरमाचे अवैध उत्खनन; जेसीबी जप्त; लाखणगावातील घटना उघडकीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

लाखणगाव (ता. आंबेगाव) येथील वनक्षेत्रातील फॉरेस्ट कंपार्टमेंट क्रमांक २५२ मध्ये रात्रीच्या सुमारास विनापरवाना प्रवेश करून जेसीबीच्या सहाय्याने मुरमाचे अवैध उत्खनन सुरू असल्याची घटना वन विभागाच्या पथकाने उघडकीस आणली. वन विभागाने तत्काळ कारवाई करत उत्खननासाठी वापरण्यात आलेला जेसीबी जप्त केला आहे. मात्र, जेसीबी चालक घटनास्थळावरून पसार झाला.

वन विभागाचे पथक नियत क्षेत्रात मध्यरात्रीच्या सुमारास गस्त व तपासणी करीत असताना वनक्षेत्रात जेसीबी मशीनच्या सहाय्याने मुरूम उत्खनन सुरू असल्याचे निदर्शनास आले. पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत जेसीबी ताब्यात घेतला. यावेळी चालकाने तेथून पळ काढला.

वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पंचनामा करून जप्त केलेले जेसीबी मशीन सुरक्षिततेच्या दृष्टीने वनपरिक्षेत्र कार्यालय, मंचर येथे आणून सुरक्षित ठिकाणी ठेवले आहे.

वनक्षेत्रातील मुरमाचे विनापरवाना उत्खनन करून त्याची वाहतूक व विक्री करण्याचा प्रयत्न झाल्याचे प्राथमिक तपासात निदर्शनास आले आहे.



**वनक्षेत्रात अवैध उत्खननाला आळा**

**वनक्षेत्रात कोणत्याही प्रकारचे अनधिकृत उत्खनन, अतिक्रमण अथवा अवैध वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध वन विभागाकडून कठोर कारवाई करण्यात येत आहे.**

**- विकास भोसले, वनपरिक्षेत्र अधिकारी, मंचर**

याप्रकरणी संबंधितांविरुद्ध वन गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास वन विभागाकडून सुरू आहे.

ही कारवाई सहाय्यक वनसंरक्षक (जुन्नर) अमृत शिंदे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल नीलम चव्हाण, पूजा कांबळे, अशोक जाधव, रामदास वळसे तसेच बिबट शीघ्र कृती दल, गावडेवाडी यांच्या पथकाने केली.

# सैनिकांसाठी राख्या; थेरगावच्या पीएम श्री माध्यमिक विद्यालयाचा स्तुत्य उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**थेरगाव : प्रतिनिधी**

रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पीएम श्री माध्यमिक विद्यालय, थेरगाव येथे स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. विद्यालयात राखी बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध रंगीबेरंगी व आकर्षक राख्या तयार केल्या.

विद्यार्थिनींनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या या राख्या देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या शूर भारतीय सैनिकांना पाठविण्यात आल्या. घर आणि कुटुंबापासून दूर राहून देशसेवा करणाऱ्या जवानांसोबत रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त आपणही आहोत, असा भावनिक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रभक्ती आणि सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना निर्माण करण्याबरोबरच त्यांच्या सृजनशीलतेला चालना देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. राख्या तयार करताना विद्यार्थिनींमध्ये मोठा उत्साह दिसून आला.

विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबासाहेब राठोड, पर्यवेक्षिका हर्षदा राऊत, मंगल आव्हाड, सोनाली जाधव, तुपे तसेच इतर शिक्षकांनी विद्यार्थिनींचे कौतुक केले.

ख्याध्यापक बाबासाहेब राठोड म्हणाले, मागील तीन वर्षांपासून आम्ही हा उपक्रम राबवत आहोत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती आणि देशप्रेमाची भावना निर्माण होते, तसेच त्यांच्या सृजनशीलतेला चालना मिळते.

हा उपक्रम राबविताना विद्यार्थ्यांमध्ये सैनिकांप्रती असलेली कृतज्ञता आणि देशसेवेची भावना प्रकर्षाने जाणवते.

# मंगळसूत्राला ५०० रुपयांची नोट लावण्याच्या बहाण्याने महिलेची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर : प्रतिनिधी**

मंगळसूत्राला ५०० रुपयांची नोट लावण्याच्या बहाण्याने एका महिलेचा विश्वास संपादन करून तिचे सुमारे ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र हातचलाखीने लंपास केल्याची घटना आंबेगाव तालुक्यातील एकलहरे गावच्या हद्दीत, जुन्या पुणे-नाशिक महामार्गालगत घडली. याप्रकरणी मंचर पोलिस ठाण्यात दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार सविता मच्छिंद्रनाथ सैद (वय ४८) या एकलहरे गावच्या हद्दीत जुन्या पुणे-नाशिक महामार्गालगत हॉटेल परिसरात असताना मोटारसायकलवरून दोन अनोळखी इसम तेथे आले. त्यापैकी मागे बसलेल्या इसमाने महिलेच्या जवळ येत, आपल्याला गुप्त दान करायचे असल्याचे सांगितले.

यानंतर त्याने आपल्याकडे असलेल्या दीड हजार रुपयांपैकी ५०० रुपयांची नोट महिलेच्या मंगळसूत्राला एकदा लावून देण्यास सांगितले. या बोलण्यावर विश्वास ठेवून महिला त्याच्या सांगण्याप्रमाणे करत असताना आरोपींनी हातचलाखी केली आणि त्यांच्या गळ्यातील सुमारे ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र लंपास केले. घटना घडल्यानंतर दोन्ही आरोपी मोटारसायकलवरून पसार झाले. काही वेळाने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने मंचर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या प्रकरणी मंचर पोलिस ठाण्यात दोन अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांचा शोध सुरू आहे. महामार्गालगत तसेच हॉटेल परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा माग काढण्याचे काम पोलिसांकडून सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. महामार्गालगत किंवा हॉटेल परिसरात अनोळखी व्यक्तींकडून अशा प्रकारे पैसे, दान किंवा धार्मिक कारणांचा हवाला देऊन जवळीक साधण्याचा प्रयत्न झाल्यास नागरिकांनी सावध राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# कोथिंबिरीचे भाव घसरले; उभ्या पिकात शेळ्या-मेंढ्या

## काढणी, जुड्या बांधणीचा खर्चही निघेना; आंबेगावातील शेतकरी आर्थिक संकटात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर : प्रतिनिधी**

बाजारात पालेभाज्यांच्या दरात मोठी घसरण झाल्याने आंबेगाव तालुक्यातील कोथिंबीर आणि मेथी उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. कोथिंबिरीला मिळणारा बाजारभाव इतका कमी झाला आहे की, काढणी, जुड्या बांधणी आणि वाहतुकीचा खर्चही वसूल होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. उत्पादन खर्चही निघत नसल्याने नागापूर येथील काही शेतकऱ्यांनी वैतागून उभ्या कोथिंबिरीच्या पिकात शेळ्या-मेंढ्या सोडल्याचा प्रकार समोर आला आहे.

अल्प कालावधीत तयार होणाऱ्या पालेभाज्यांमधून चांगले उत्पन्न मिळेल, या अपेक्षेने शेतकरी कोथिंबीर आणि मेथीची लागवड करतात. मात्र, बाजारात आवक वाढताच दरात मोठी घसरण होत असल्याने उत्पादन खर्च आणि मिळणारे उत्पन्न यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे.



कोथिंबिरीची काढणी करण्यासाठी मजुरी, त्यानंतर जुड्या बांधणे, बाजार समितीपर्यंत वाहतूक आणि विक्रीसाठी होणारा अन्य खर्च शेतकऱ्यांना करावा लागतो. माल बाजारात नेल्यानंतर अपेक्षित भाव मिळाला नाही, तर काढणी व वाहतुकीचा खर्चही पदरमोड करून करावा लागतो. त्यामुळे उभे पीक ठेवायचे की काढून बाजारात पाठवायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे.

कोथिंबीर विक्रीतून काढणी आणि वाहतुकीचा खर्चही निघत नाही. कष्ट करून पीक घेऊनही उत्पादन खर्च वसूल होत नसेल तर शेती कशी करायची? त्यामुळे वैतागून उभ्या कोथिंबिरीच्या पिकात शेळ्या-मेंढ्या सोडाव्या लागल्या, अशी व्यथा नागापूर येथील कोथिंबीर उत्पादक शेतकरी दत्तात्रय वाघ यांनी व्यक्त केली.

**वाढत्या खर्चाचा फटका**

एकीकडे बियाणे, खते, औषधे, पाणी, मजुरी आणि वाहतुकीचा खर्च सातत्याने वाढत आहे, तर दुसरीकडे तयार शेतमालाला योग्य बाजारभाव मिळत नसल्याने पालेभाजी उत्पादकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत किमान योग्य भाव मिळावा, बाजारातील आवक आणि दराबाबत प्रभावी नियोजन करावे तसेच शेतमालाची नासाडी टाळण्यासाठी प्रक्रिया उद्योग व पर्यायी विक्री व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**किरकोळ बाजारात कोथिंबीर अवघ्या पाच रुपयांची**

किरकोळ बाजारात सध्या कोथिंबिरीची एक जुडी अवघ्या पाच रुपयांना विकली जात आहे. या दरात उत्पादन, काढणी आणि वाहतुकीचा खर्चही भरून निघणे कठीण असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. मेथीची आवक तुलनेने कमी असल्याने तिची एक जुडी १५ ते २० रुपये दराने विकली जात आहे. यापूर्वी कोथिंबिरीची एक जुडी ३० ते ५० रुपये दराने विकली गेल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली.

शेतकऱ्याच्या शेतात कष्टाने उगवलेली कोथिंबीर बाजारात कवडीमोल ठरत असल्याने 'पीक घ्यायचे तरी कशासाठी?' हा प्रश्न या निमित्ताने पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# फ्लॉवर काढणी जोरात सुरू; चांगल्या बाजारभावामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी : प्रतिनिधी**

तरकारी पिकांमध्ये फ्लॉवरला गेल्या दोन आठवड्यांपासून चांगला बाजारभाव मिळत असल्याने आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील फ्लॉवर उत्पादक शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सध्या फ्लॉवरला सरासरी प्रति क्विंटल १,८०० ते ३,००० रुपये बाजारभाव मिळत असून, शेतकऱ्यांना उत्पादन खर्च वजा जाता समाधानकारक नफा मिळत आहे.

घोडनदीच्या काठावर तसेच डिंभा धरणाच्या उजव्या कालव्यालगत असलेल्या निरगुडसर, लाखणगाव, देवगाव, काठापूर बुद्रुक, पोंदेवाडी आणि जारकरवाडी परिसरात बाराही महिने शेतीसाठी पाणी उपलब्ध असल्याने शेतकरी विविध नगदी पिकांसह तरकारी पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड करतात. ऊस, कांदा, बटाटा, बीट याबरोबरच फ्लॉवरची लागवडही मोठ्या प्रमाणावर केली जाते.



फ्लॉवरचे पीक साधारण ५० ते ५५ दिवसांत काढणीला येते. एका एकरातून सरासरी २०० ते २२५ पिशव्या उत्पादन मिळते. एका पिशवीचे वजन सुमारे ५० किलो असते. फ्लॉवरच्या एका एकर पिकासाठी साधारण ५० ते ६० हजार रुपये उत्पादन खर्च येतो. सध्या बाजारात मिळत असलेल्या चांगल्या दरामुळे उत्पादन खर्च वजा जाता शेतकऱ्यांना चांगला नफा मिळत असल्याचे चित्र आहे.

सध्या फ्लॉवरला चांगला बाजारभाव मिळत असल्याने उत्पादन खर्च वजा जाता एकरी समाधानकारक नफा मिळत आहे. त्यामुळे फ्लॉवर उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, असे मेंगडेवाडी येथील फ्लॉवर उत्पादक शेतकरी हनुमंत भिकाजी टाव्हरे यांनी सांगितले. दरम्यान, फ्लॉवरला उत्तर भारतातील राज्यांमध्ये चांगली मागणी आहे. त्यामुळे व्यापारी थेट शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन फ्लॉवरची खरेदी करीत आहेत. त्यानंतर हा माल दिल्लीसह उत्तर भारतातील बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी पाठविला जात असल्याचे फ्लॉवर व्यापाऱ्यांनी सांगितले. चांगला बाजारभाव आणि उत्तर भारतातील वाढती मागणी यामुळे सध्या फ्लॉवरची काढणी परिसरात जोरात सुरू असून, शेतकऱ्यांना नगदी उत्पन्नाचा चांगला आधार मिळाला आहे.

# दिशा फाउंडेशनकडून खामगाव शाळेतील १०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व स्कूल बॅगचे वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खामगाव येथील १०० विद्यार्थ्यांना डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह फॉर सेल्फ हेल्प अँड अवेकनिंग (दिशा), पुणे यांच्या वतीने स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने दिशा फाउंडेशनच्या वतीने विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून खामगाव शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व स्कूल बॅग देण्यात आल्या.

कार्यक्रमाला दिशा फाउंडेशनच्या विश्वस्त इंदू गुप्ता, प्रदीप गुप्ता, सुनीता थोरवे, प्रकल्प व्यवस्थापक प्रवीण भोईरकर यांच्यासह पल्लवी सुशील घोलप, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंकुश घोलप, मुख्याध्यापक तानाजी तळपे, राममामा पठारे, रेश्मा घोलप, मनिषा घोलप तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी पल्लवी सुशील घोलप यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अडचणी येऊ




नयेत, यासाठी सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. खामगाव शाळेतील विद्यार्थी इस्रो, नासा यांसारख्या विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये तसेच परीक्षांमध्ये सहभागी होऊन यश संपादन करत आहेत, ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंकुश घोलप यांनी दिशा फाउंडेशनच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी संस्थेचे आभार मानले. या उपक्रमासाठी अंकुश कोकणे सर यांनी विशेष पाठपुरावा केला.

विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करून मेहनत घ्यावी, आपल्या आवडीच्या क्षेत्रात प्रगती करावी आणि जीवनातील ध्येय साध्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. इस्रोच्या अंतराळ संशोधन संस्थेला भेट देण्यासाठी निवड झालेल्या शौर्य जितेंद्र नेहरकर याचे दिशा फाउंडेशनच्या विश्वस्त इंदू गुप्ता यांनी अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप लोहकरे सर यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक तानाजी तळपे सर यांनी मानले.

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देणारे दिशा फाउंडेशनचे हे योगदान प्रेरणादायी असून, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी संस्थेने दिलेल्या सहकार्याबद्दल शाळेच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

## सारांश वृत्त

### कांदिवलीत अमराठी रिक्षाचालकांची मुजोरी; प्रवासी घेऊन जाणाऱ्या मराठी चालकाला मारहाण, मनसे आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील रिक्षा-टॅक्सी चालकांना व्यावहारिक मराठी येणे बंधनकारक असून या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा-टॅक्सी चालकांविरोधात आरटीओने मोहीम उघडली आहे. १५ ऑगस्टपासून रिक्षा-टॅक्सी चालकांची मराठी चाचणी घेतली जात आहे. आता राज्य शासनाच्या या नियमांना झुगारून काही अमराठी रिक्षाचालक रस्त्यावर उतरले आहेत. कांदिवली येथे या रिक्षाचालकांनी रस्त्यावर वाहने अडवण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे कांदिवली पश्चिमेकडे एका मराठी रिक्षाचालकाला ४ ते ५ अमराठी रिक्षाचालकांनी अडवून त्यांना धमकावण्याचा आणि मारहाण करण्याचा प्रयत्न केल्याचं समोर आले आहे. या घटनेनंतर मनसेने आक्रमक पवित्रा घेतला. कांदिवलीतील मराठी रिक्षाचालक प्रकाश बंडीशेजवळ हे हिंदुस्तान नाक्याहून स्टेशनच्या दिशेने भाडे घेऊन जात होते. त्यावेळी क्रोमा शोरूमसमोर काही अमराठी रिक्षाचालकांनी त्यांना अडवले. त्यांच्या रिक्षाचे वायपर तोडले, धक्काबुक्की केली आणि मारहाणही केली. अमराठी रिक्षाचालकांनी रिक्षा बंद ठेवण्याची धमकी दिली. त्यावर प्रकाश यांनी मी मराठी आहे, तुम्हाला अडचण काय? असा प्रश्न केला. त्यावर आज संप आहे असं सांगत त्यांनी मारहाण केली असा आरोप प्रकाश बंडीशेजवळ यांनी केला. या मारहाणीत मराठी रिक्षाचालकाच्या रिक्षाचे नुकसान झाले. त्याशिवाय रिक्षाचालकाला किरकोळ दुखापत झाली आहे. या लोकांवर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी पीडित रिक्षाचालकाने केली आहे. तर या घटनेबाबत मनसेचे विभाग अध्यक्ष दिनेश साळवी यांना कळताच ते मनसेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांसह घटनास्थळी पोहचले. स्थानिक पोलीसही घटनास्थळी पोहचले. त्यांनी परिसरात उभ्या असणाऱ्या रिक्षाचालकांना एकतर रिक्षा सुरू करा अन्यथा या रस्त्यावरून रिक्षा हटवा असं सांगितले. त्यावेळी काही रिक्षाचालकांनी आम्हाला रिक्षा चालवायच्या आहेत, परंतु काहींनी धमकी दिल्याने घाबरवून रिक्षा बंद ठेवल्या होत्या असं सांगितले.

# हिजाबवर न्यायालयाचा निर्णय; ओवेसींचा संताप
# इस्लामच्या मूलभूत अधिकारांवरच हल्ला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

हिजाबच्या मुद्द्यावरून देशातील राजकीय आणि सामाजिक वातावरण पुन्हा तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शाळेत मुस्लिम विद्यार्थिनीला हिजाब घालण्याची परवानगी नाकारणाऱ्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयावर ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीनचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा निर्णय म्हणजे इस्लामवर हल्ला असल्याचा गंभीर आरोप ओवेसी यांनी केला आहे.

हैदराबादमध्ये ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या पूर्वसंध्येला मंगळवारी रात्री आयोजित जाहीर सभेत बोलताना ओवेसी यांनी न्यायालयाच्या भूमिकेवर थेट प्रश्न उपस्थित केला. इस्लाममध्ये काय आवश्यक आहे हे ठरवणारे तुम्ही कोण? असा सवाल त्यांनी केला. हिजाब हा इस्लाममधील धार्मिक आचरणाचा भाग असल्याचा दावा करताना त्यांनी न्यायालयाच्या निर्णयामुळे संविधानातील धार्मिक स्वातंत्र्य आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकारांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे म्हटले.

ओवेसी यांच्या मते, हा निर्णय



संविधानाच्या अनुच्छेद २५ आणि अनुच्छेद १९ शी संबंधित मूलभूत अधिकारांच्या विरोधात आहे. त्यामुळे न्यायालयाचा निर्णय चुकीचा असून तो मुस्लिमांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर परिणाम करणारा असल्याची भूमिका त्यांनी मांडली.

मात्र, या वक्तव्यामुळे हिजाबचा प्रश्न पुन्हा एकदा केवळ शैक्षणिक संस्थांमधील पोशाखाच्या नियमांपुरता मर्यादित राहत नाही, तर तो धार्मिक स्वातंत्र्य, संविधानिक अधिकार आणि न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या मोठ्या चर्चेच्या केंद्रस्थानी येतो.

विशेष म्हणजे, याच भाषणात ओवेसी यांनी 'वंदे मातरम्'च्या इतिहासाचाही संदर्भ दिला. काही संघटना संपूर्ण 'वंदे मातरम्' म्हणण्याचा आग्रह का धरतात, असा सवाल उपस्थित करताना त्यांनी या गीताच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा दाखला दिला.

हिजाब असो किंवा 'वंदे मातरम्'-धर्म, संविधान आणि राष्ट्रवाद यांच्यातील सीमारेषा नेमकी कुठे आखायची, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. न्यायालयीन निर्णयानंतर ओवेसींची तीव्र प्रतिक्रिया या वादाला आणखी राजकीय धार देणारी ठरली आहे. आता या निर्णयाविरोधात पुढील कायदेशीर पाऊल कोणते उचलले जाते आणि त्याचा व्यापक परिणाम काय होतो, याकडे देशाचे लक्ष लागले आहे.

## भारत-चीन सीमावादावर मोठी हालचाल! 'लवकर आणि ठोस तोडगा' काढण्याचे संकेत; सीमारेषेच्या प्रश्नावर चर्चेला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई । प्रतिनिधी

भारत आणि चीन यांच्यातील दीर्घकाळ प्रलंबित सीमावादावर चर्चेच्या माध्यमातून पुढे जाण्याचे महत्त्वपूर्ण संकेत मिळाले आहेत. २५व्या विशेष प्रतिनिधी स्तरावरील बैठकीनंतर दोन्ही देशांनी सीमारेषेच्या निश्चितीबाबत लवकर आणि ठोस फलश्रुती साधण्यासाठी चर्चा पुढे नेण्याचे मान्य केले आहे. २६ ऑगस्ट २०२६ रोजी दोन्ही देशांनी जाहीर केलेल्या आठ मुद्द्यांच्या निष्कर्षपत्रकातून ही माहिती समोर आली.

चीनची राजधानी बीजिंग येथे २५ ऑगस्ट रोजी भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्यात विशेष प्रतिनिधी स्तरावरील २५वी बैठक झाली. सीमावादावर चर्चा करण्यासाठी दोन्ही देशांकडून विशेष प्रतिनिधी यंत्रणा कार्यरत आहे. या बैठकीनंतरच्या निष्कर्षपत्रकात सीमारेषेच्या प्रश्नावर केवळ चर्चा सुरू ठेवण्याऐवजी प्रत्यक्ष आणि महत्त्वपूर्ण प्रगती साधण्यावर भर देण्यात आला आहे. मात्र, 'लवकर आणि ठोस फलश्रुती' या शब्दप्रयोगाचा नेमका अर्थ काय आणि प्रत्यक्ष सीमारेषा निश्चितीच्या प्रक्रियेत त्यातून किती प्रगती होणार, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. भारत-चीन सीमावाद अनेक दशकांपासून कायम असून, पूर्व लडाखमधील तणावानंतर दोन्ही देशांमधील संबंधांवर त्याचा मोठा परिणाम झाला आहे. याचबरोबर सीमापार वाहणाऱ्या नद्यांच्या प्रश्नावरही महत्त्वपूर्ण सहमती झाली आहे. भारताच्या आग्रहानंतर सीमापार नद्यांबाबतच्या तज्ज्ञ स्तरावरील यंत्रणेची पुढील बैठक सप्टेंबर २०२६ मध्ये घेण्याचे दोन्ही देशांनी मान्य केले आहे. नदीप्रवाह, पाण्याची उपलब्धता आणि जलविषयक माहितीची देवाणघेवाण याबाबत दोन्ही देश संवाद कायम ठेवणार आहेत. सीमा प्रश्नासोबतच जलसुरक्षेचा मुद्दाही भारतासाठी अत्यंत संवेदनशील आहे. विशेषतः चीनमधून भारताकडे वाहणाऱ्या नद्यांच्या संदर्भात जलविषयक माहिती वेळेवर मिळणे महत्त्वाचे मानले जाते.

## कोट्यात पुन्हा एका स्वप्नाचा अंत! नीटची तयारी करणाऱ्या २० वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू; यंदा आठवा धक्कादायक प्रकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र
कोटा : प्रतिनिधी ।

वैद्यकीय प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या नीट परीक्षेची तयारी करण्यासाठी देशभरातून हजारो विद्यार्थी कोट्यात दाखल होतात. मात्र, याच कोट्यात विद्यार्थ्यांच्या मानसिक तणावाचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. मध्य प्रदेशातील २० वर्षीय नीट परीक्षार्थीचा कोट्यातील भाड्याच्या घरात मृत्यू झाल्याची घटना बुधवारी, २६ ऑगस्ट रोजी समोर आली. पोलिसांनी या घटनेची माहिती दिली असून, यंदाच्या वर्षातील कोचिंग विद्यार्थ्यांच्या मृत्यूची ही आठवी घटना असल्याचे वृत्त आहे.

ही विद्यार्थिनी वैद्यकीय प्रवेश परीक्षेची दुसऱ्यांदा तयारी करत होती. मागील नीट परीक्षेत तिला सुमारे ४५० गुण मिळाले होते. या निकालानंतर ती कथितरीत्या मानसिक तणावात असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, तिच्या मृत्यूमागील नेमके कारण तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, विद्यार्थिनी कुन्हाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लँडमार्क सिटी परिसरातील भाड्याच्या घरात राहत होती. तिची धाकटी बहीणही कोट्यातच कोचिंग घेत होती. मंगळवारी, २५ ऑगस्टच्या रात्री वर्ग संपल्यानंतर बहीण घरी परतली असता हा प्रकार तिच्या निदर्शनास आला. त्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली आणि पुढील तपास सुरू करण्यात आला. या घटनेने पुन्हा एकदा कोट्यातील स्पर्धात्मक शिक्षणव्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. लाखो रुपयांचा खर्च, कठीण अभ्यासक्रम, अपेक्षांचे ओझे, परीक्षेतील गुण आणि पालकांच्या अपेक्षा यांचा विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर किती परिणाम होतो, याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. नीटमध्ये अपेक्षित गुण न मिळणे म्हणजे आयुष्य संपणे नव्हे. मात्र, विद्यार्थ्यांच्या मनात ही जाणीव निर्माण करण्यात शिक्षणसंस्था, पालक, प्रशासन आणि कोचिंग व्यवस्था अपयशी ठरत असेल, तर त्याची किंमत कोण मोजणार?

कोटा पुन्हा चर्चेत आला आहे; पण प्रश्न केवळ एका विद्यार्थिनीचा नाही. प्रश्न आहे त्या संपूर्ण व्यवस्थेचा, जिथे गुणांच्या शर्यतीत विद्यार्थ्यांच्या आयुष्यापेक्षा निकालाला अधिक महत्त्व दिले जाते.

## शाळेपासून मतदानापर्यंत निवडणूक आयोगाचा नव्या पिढीवर डोळा; २०२९ ची तयारी की मतदार शिक्षणाची नवी मोहीम?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

२०२९ च्या लोकसभा निवडणुकीला अजून वेळ असला, तरी निवडणूक आयोगाने आतापासूनच नव्या पिढीवर लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली आहे. नव्या आणि तरुण पिढीमध्ये निवडणूक प्रक्रिया, मतदानाचे महत्त्व आणि लोकशाहीविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आयोगाने नव्याने जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. मात्र, या मोहिमेकडे केवळ मतदार शिक्षण म्हणून पाहायचे की भविष्यातील राजकीय वातावरण घडवण्याची पूर्वतयारी म्हणून, हा प्रश्नही उपस्थित होत आहे.

निवडणूक आयोगाच्या नव्या आराखड्यानुसार देशातील इयत्ता नववी ते बारावीतील विद्यार्थी, महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील तरुणांना या अभियानाच्या केंद्रस्थानी ठेवले जाणार आहे. देशातील तब्बल ४ हजार १२३ विधानसभा मतदारसंघांपर्यंत ही मोहीम पोहोचवण्याचे नियोजन आहे. आयोगाचा दावा आहे की, या वयोगटातील नागरिकांना मतदान प्रक्रियेची माहिती देऊन भविष्यात ते स्वतः जागरूक मतदार बनावेत आणि इतरांनाही मतदानासाठी प्रोत्साहित करावेत, हा या उपक्रमामागचा उद्देश आहे.

आयोगाच्या आकडेवारीनुसार देशात १८ ते २६ वयोगटातील तब्बल १४ कोटी ७८ लाख नागरिक आहेत. म्हणजेच देशाच्या भविष्यातील मतदारसंख्येचा हा प्रचंड मोठा वर्ग आहे. समाजमाध्यमांवर सक्रिय असलेली ही पिढी राजकीय चर्चांवर, सार्वजनिक मतप्रवाहांवर आणि निवडणूक वातावरणावर मोठा प्रभाव टाकू शकते.

पण इथेच खरी कसोटी आहे. निवडणूक आयोगाची जनजागृती मोहीम राजकीय पक्षांच्या प्रचारापासून पूर्णपणे अलिप्त राहणार का? शाळा आणि महाविद्यालयांसारख्या शैक्षणिक संस्थांमध्ये लोकशाही शिक्षणाच्या नावाखाली कोणता संदेश दिला जाणार? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तरुणांना फक्त मतदानासाठी तयार केले जाणार आहे की प्रश्न विचारणारे, माहिती तपासणारे आणि सत्तेला जाब विचारणारे नागरिक म्हणून घडवले जाणार आहे?

लोकशाही मजबूत करण्यासाठी जागरूक मतदार आवश्यक आहेत. पण जागरूकता म्हणजे केवळ मतदानाचा हक्क सांगणे नव्हे; तर मतदाराला उमेदवार, धोरणे, आश्वासने आणि सत्तेच्या कामगिरीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्याची क्षमता देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

त्यामुळे २०२९ पूर्वीची ही मोहीम किती प्रभावी ठरते, हे केवळ किती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली यावर नाही, तर किती तरुणांना स्वतंत्र विचार करणारे नागरिक बनवले यावर ठरणार आहे. कारण लोकशाहीची खरी ताकद मतपेटीत असते; पण तिची खरी दिशा मतदाराच्या विवेकबुद्धीत ठरते.

# डीएनए पुरावा म्हणजे संमतीचा अभाव सिद्ध होत नाही! जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा; पोक्सो प्रकरणात आरोपीला जामीन

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

पोक्सो कायद्याअंतर्गत दाखल लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात केवळ डीएनए अहवालाच्या आधारे आरोपीविरुद्धचा आरोप अंतिम मानता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय जम्मू-काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाने दिला आहे. २६ ऑगस्ट २०२६ रोजी समोर आलेल्या या निर्णयात न्यायमूर्ती संजय धर यांनी स्पष्ट केले की, डीएनए पुरावा आरोपीचा जैविक पुराव्याशी संबंध दर्शवू शकतो; मात्र त्यावरून लैंगिक संबंध संबंधित व्यक्तीच्या संमतीशिवाय झाले, हे आपोआप सिद्ध होत नाही.

न्यायालय एका जामीन अर्जावर सुनावणी करत होते. संबंधित आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ६४ तसेच बालकांना लैंगिक अपराधांपासून संरक्षण देणाऱ्या कायद्यातील कलम ४ आणि ६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तक्रारदार पीडितेने न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान आपली भूमिका बदलली होती. तिने आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप नाकारला आणि ती साक्षीदार म्हणून प्रतिकूल ठरली. दुसरीकडे, तपास यंत्रणेकडे आरोपीशी संबंधित जैविक पुरावा असल्याचे डीएनए अहवालातून समोर आले होते.

याच पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, डीएनए तपासणीमुळे प्रथमदर्शनी जैविक लैंगिक संपर्क सिद्ध होऊ शकतो; मात्र गुन्ह्याचा आवश्यक घटक असलेला संमतीचा अभाव केवळ डीएनए पुराव्याच्या आधारे सिद्ध होत नाही. डीएनए अहवालाचे पुराव्यात्मक महत्त्व आणि त्याचा परिणाम पीडितेच्या साक्षीसोबतच खटल्याच्या अंतिम सुनावणीदरम्यान तपासावा लागेल, असे न्यायालयाने नमूद केले. म्हणजेच, न्यायालयाने डीएनए पुराव्याचे महत्त्व नाकारलेले नाही; परंतु वैज्ञानिक पुरावा आणि पीडितेची साक्ष यांचा एकत्रित विचार करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

या निरीक्षणांच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने आरोपीला जामीन मंजूर केला. मात्र, हा निर्णय पोक्सो कायद्यातील आरोप कमकुवत ठरवणारा सार्वत्रिक नियम नसून, संबंधित प्रकरणातील पुरावे, पीडितेची साक्ष आणि खटल्याच्या परिस्थितीच्या आधारे घेतलेला निर्णय आहे.

या निर्णयामुळे लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये वैज्ञानिक पुरावे, पीडितेची साक्ष आणि संमतीचा कायदेशीर प्रश्न यांचा परस्पर संबंध पुन्हा चर्चेत आला आहे. न्यायालयाने एक स्पष्ट संदेश दिला आहे डीएनए पुरावा महत्त्वाचा आहे; पण तो एकटाच संमतीचा अभाव सिद्ध करणारा अंतिम पुरावा नाही.

## हुंडाबळी थांबवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचा दणका! खटले वर्षानुवर्षे रखडवणाऱ्या व्यवस्थेला आता मुदतीची जाणीव

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

हुंड्याच्या प्रथेवर कायद्याने बंदी असतानाही प्रत्यक्ष अंमलबजावणीत होणारी दिरंगाई आणि वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित राहणारे हुंडाबळीचे खटले यावर सर्वोच्च न्यायालयाने आता कठोर भूमिका घेतली आहे. हुंडा प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, पीडित महिलांना तातडीची मदत, खटल्यांना प्राधान्य आणि प्रलंबित प्रकरणांचे नियमित परीक्षण यासाठी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्देश जारी केले. न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले.

या निर्देशांची पार्श्वभूमी १५ डिसेंबर २०२५ रोजीच्या उत्तर प्रदेश सरकार विरुद्ध अजमल बेग या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात आहे. त्या निर्णयात न्यायालयाने हुंडा ही केवळ एका समाजापुरती मर्यादित सामाजिक समस्या नसून व्यापक सामाजिक दुष्प्रथा असल्याचे अधोरेखित केले होते. हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ अस्तित्वात असूनही त्याची अंमलबजावणी अनेक पातळ्यांवर प्रभावी होत नसल्याची नोंद न्यायालयाने केली होती.

नव्या निर्देशांनुसार राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्यांचे काम प्रभावीपणे सुरू ठेवावे आणि त्यांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवावी. त्याचबरोबर एक खिडकी केंद्रे, कुटुंब समुपदेशन केंद्रे, महिला मदत कक्ष, पीडितांना सहाय्य देणारी यंत्रणा, मदतवाहिन्या आणि ऑनलाइन तक्रार निवारण व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. म्हणजेच, तक्रार दाखल केल्यानंतर पीडित महिलेला मदतीसाठी वेगवेगळ्या कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, हा या निर्देशांचा स्पष्ट उद्देश आहे.

सर्वोच्च न्यायालयाने केवळ न्यायालयीन प्रक्रियेवर भर दिलेला नाही, तर सामाजिक मानसिकता बदलण्याची गरजही अधोरेखित केली आहे. शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग, राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि संबंधित संस्थांनी हुंड्याची सामाजिक दुष्प्रथा, स्त्री-पुरुष समानता, संविधानिक मूल्ये आणि महिलांचे अधिकार याबाबत सातत्यपूर्ण जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शैक्षणिक अभ्यासक्रम, जनजागृती मोहिमा, समुदाय पातळीवरील कार्यक्रम आणि कायदेविषयक साक्षरता यांचा त्यात समावेश असेल.

सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे खटल्यांच्या वेगाबाबत न्यायालयाने दिलेली दिशा. भारतीय दंड संहितेतील कलम ३०४-ब आणि ४९८-अ तसेच भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलम ८० आणि ८५ अंतर्गत प्रकरणांना शक्य तितके प्राधान्य देण्याचे निर्देश आहेत. तीन वर्षांपेक्षा अधिक काळ प्रलंबित असलेल्या, विशेषतः आरोप निश्चित करण्याच्या किंवा साक्ष नोंदवण्याच्या टप्प्यावर अडकलेल्या प्रकरणांची जिल्हा न्यायव्यवस्थेने ओळख करून मासिक किंवा त्रैमासिक पातळीवर त्यांचे परीक्षण करावे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

आरोपपत्र दाखल झाल्यानंतर आरोपीची उपस्थिती लवकर सुनिश्चित करणे आणि शक्य असल्यास ६० ते ९० दिवसांच्या आत आरोप निश्चित करण्याचा प्रयत्न करणे, तसेच त्यानंतर साक्षी नोंदवण्यास सुरुवात करून ती शक्य तितकी सलगपणे घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, अनेक आरोपी, अतिरिक्त आरोपपत्र, न्यायवैज्ञानिक तपासातील विलंब किंवा आरोपी अनुपस्थित राहणे यांसारख्या अपवादात्मक परिस्थितीत हे कालमर्यादा-सदृश निकष मार्गदर्शक राहतील. अनावश्यक तहकुबींवरही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. आरोप निश्चित झाल्यानंतर महत्त्वाच्या साक्षीदारांच्या तपासणीसाठी न्यायालयाने स्वतंत्र वेळापत्रक तयार करावे, तपास अधिकाऱ्यांची बदली किंवा निवृत्ती झाल्यास पर्यायी अधिकारी नियुक्त करावा आणि वारंवार गैरहजर राहणाऱ्या वकिलांमुळे सुनावणी लांबू नये यासाठी आवश्यकतेनुसार विधी सेवा वकील किंवा न्यायालयीन सहाय्यक नियुक्त करण्याचा पर्याय वापरावा, असे निर्देश आहेत. तंत्रज्ञानाचाही वापर वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. उच्च न्यायालयांनी न्यायालयीन माहिती प्रणालीमध्ये टप्प्यानुसार प्रलंबित प्रकरणांचा मागोवा, डिजिटल नियंत्रण फलक, जुन्या प्रकरणांसाठी स्वयंचलित सूचना आणि प्रकरण निरीक्षण व्यवस्था विकसित करण्याचा प्रयत्न करावा, असे न्यायालयाने सांगितले आहे. इतकेच नव्हे, तर न्यायाधीश, पोलीस अधिकारी, सरकारी वकील, संरक्षण अधिकारी आणि समुपदेशकांसाठी नियमित प्रशिक्षण व संवेदनशीलता कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देश आहेत. योग्य वैवाहिक वादांमध्ये, मृत्यू किंवा गंभीर हिंसाचाराचा आरोप नसल्यास, कायद्याच्या चौकटीत समेट किंवा समुपदेशनाचा पर्यायही विचारात घेता येईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. आता सर्वात मोठी जबाबदारी राज्य सरकारे आणि उच्च न्यायालयांवर आहे. त्यांना दरवर्षी १५ जानेवारी, १५ मे आणि १५ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयासमोर अनुपालन अहवाल सादर करावा लागणार आहे. या अहवालात प्रलंबित आणि निकाली काढलेल्या प्रकरणांची संख्या, प्रकरणांची सद्यस्थिती, जनजागृती कार्यक्रम, हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्यांची माहिती आणि प्रशिक्षण उपक्रमांचा तपशील द्यावा लागेल. ही व्यवस्था प्रलंबित प्रकरणांमध्ये लक्षणीय घट होईपर्यंत सुरू राहणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश कागदावर कठोर दिसत असले, तरी खरी परीक्षा आता अंमलबजावणीची आहे. हुंडा मागणाऱ्यांना कायद्याची भीती वाटत नसेल आणि पीडित महिलेला न्याय मिळण्यासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागत असेल, तर कायद्याचे अस्तित्वच अपुरे ठरते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश केवळ न्यायालयीन निर्देश न राहता प्रशासन, पोलीस, न्यायव्यवस्था आणि समाजासाठी जबाबदारीची कठोर आठवण ठरणार आहे.